240

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018
Special Issue-66

## Society, Culture and Environment

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

Q242




| | | |
|---|---|---|
| 24 | Noise Pollution on Pune – Solapur Highway: A Case Study of Tembhurni Village in Solapur District (M.S.) **Shri. Nangare M. R. & Miss. Patil S. S.** | 107 |
| 25 | Cultural Trends in Current Scenario **Dr. G. N. Nimbarte** | 111 |
| 26 | Wrapping Food in Newspaper is Harmful **Dr. Rahul Pardeshi** | 115 |
| 27 | Engaging with Postmodernism : Helen Dunmore's Novels **Dr. Leelawati Patil** | 119 |
| 28 | Environmental Safety of Street Food and Hygiene in Pimpri-Chinchwad Region **Dr. Prakash Patil** | 123 |
| 29 | Socio-Cultural Factors and Environment **Vijay Patil** | 127 |
| 30 | Concept of "Commune" in '*Ekek Paan Galawaya*' **Dr. Sonali Pawar.** | 131 |
| 31 | Environmental Monitoring : Tool of Healthy Environment **Smt. Asha Potalwad** | 140 |
| 32 | Impact of Jalshiwar Yojana on the Growth of Income in Drought Prone Area (A Case Study of Village Dhamangaon in Barshi Tahsil of Solapur District) **Dr. V. K. Pukale** | 143 |
| 33 | Studies On Sacred Groves As Spiritual Forest Pockets To Consurve Natural Resources: A Study With Reference To Sangli District **Sanjay Sathe, Pandurang Kale and Satish Desai** | 149 |
| 34 | Effect of Biofertilizers on Seed Germination of Maize (Zea Mays L.) Varieties Eco-92 And African Tall **Madhumati Shinde, S. K. Khade & C. R. Patil** | 160 |
| 35 | Folk Marriage Songs of Karnataka and Its Relevance to Modern Culture **Dr. Nalini Waghmare** | 165 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 36 | भारतीय समाज व आदिवासी संस्कृती परंपरा | **डॉ.आर.एम.भिसे** | 170 |
| 37 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे "ग्रामगीतीतेतील" पर्यावरणपूरक विचार | **डॉ. चंपाताई बोधले** | 173 |
| 38 | पर्यावरण संवर्धनासाठी सुसंस्कृतीची गरज | **प्रा. बालाजी बोडके** | 176 |
| 39 | समाज व सामाजिक परिवर्तन | **प्रा.गंगाधर चव्हाण** | 179 |
| 40 | मराठवाड्यातील समाज व संस्कृती : एक दृष्टीक्षेप | **डॉ. अनिल देशमुख** | 181 |
| 41 | पर्यावरण संरक्षण चळवळ : एक काळाची गरज | **डॉ. सुरेश धनवडे** | 188 |
| 42 | धनगर समाज आणि सामाजी परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्याम | **प्रा. अनिल गाडेकर** | 193 |
| 43 | कोसळता गावगाडा व जात : वर्चस्वाची सत्ता समीकरणे | **डॉ. नितीन गायकवाड** | 198 |
| 44 | भारतीय ग्रामीण संयुक्त कुटुंबाच्या परिवर्तनाचा अभ्यास | **डॉ. एस. एम. गावंडे** | 201 |
| 45 | मध्ययुगीन धार्मिक अभिसरण आणि सांस्कृतिक वारसा | **श्री अभिजीत घाडगे** | 206 |
| 46 | संस्कृती आणि पर्यावरण यांचे शाश्वत विकासातील योगदान | **डॉ. अंजली जोशी- टेंभूर्णीकर** | 212 |
| 47 | साहित्य आणि समाजाचे अनुबंधात्मक विश्लेषण | **डॉ. पुरुषोत्तम जुन्रे** | 217 |
| 48 | १९४२ च्या चलेजाव चळवळीतील शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान | **डॉ संतोष कदम** | 221 |
| 49 | देशभक्त लीलासार आणि समकालीन राजकीय परिस्थिती | **डॉ. गोविंद काळे** | 226 |
| 50 | महाराष्ट्रातील दलित चळवळ : एक सामाजिक बदल | **प्रा. रावसाहेब कांबळे** | 231 |
| 51 | भारतीय खेड्यातील समाज आणि संस्कृतीचा सांस्कृतिक आणि मानववंश शास्त्रीय अभ्यास | **डॉ. संजय कांबळे** | 235 |
| 52 | समाज आणि पर्यावरण | **प्रा. संभाजी कांबळे** | 244 |




LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66- | October. 2018

# 'पर्यावरण संरक्षण चळवळ : काळाची गरज'

डॉ. सुरेश वि. धनवडे
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शंकरनगर,
ता. बिलोली जि. नांदेड (मराठवाडा)
पिन कोड: ४३१७३६
भ्रमणभाष: ९८९०४१९८५०
E-mail-sureshdhanwade@gmail.com

**प्रस्तावना:**

पृथ्वीवरील जमीन, पाणी व वातावरण यांनी बनलेला भौतिक परिसर, त्यात आढणाऱ्या निर्जीव व सजीव सृष्टीतील विविध घटक आणि त्या सर्वांचे परस्परसंबंध यांचा पर्यावरण या संकल्पनेत समावेश होतो; अशा परस्परसंबंधाचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र. पृथ्वीवरील सर्व सजीव घटक हे एका संतुलित गतिमान व्यवस्थेचे भाग आहेत. त्या सर्वांचे अस्तित्व या ना त्या प्रकारे एकमेकांवर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे ते पृथ्वीवरील घन, द्रव्य आणि वायुरूपातील साधनांवरही अवलंबून आहे. जनन, भरणपोषण आणि नाश या अवस्थांमधून प्रवास करीत पृथ्वीवरील सर्व सजीव जगत असतात. अशा व्यवस्थेला पर्यावरणव्यवस्था किंवा परिसंस्था म्हणतात. पर्यावरणव्यवस्था गतिमान राखण्यासाठी बाहेरून फक्त सूर्याची उर्जा घेतली जाते. तिच्या साहायाने अशा व्यवस्थेतील सर्व सजीव घटक निर्मिती त्या व्यवस्थेतील सजीव घटकांची संख्या प्रमाणबध्द नियंत्रणाखाली राखली जाते. अशा प्रकारे संपूर्ण व्यवस्था एका संतुलित अवस्थेत राहते. आपल्याला ज्ञात असलेली अशा सर्वात मोठी पर्यावरणव्यवस्था म्हणजे पृथ्वी.[१]

असंख्य सजीव आणि निर्जीव प्रवासी घेऊन आपल्या भोवतीच्या वातावरणाच्या कोषासह एखाद्या स्वयंपूर्ण अवकाशयानाप्रमाणे युगानुयुगे अंतराळात भटकणाऱ्या या व्यवस्थेत बाहेरून एकच गोष्ट प्रवेष करते; ती म्हणजे सौर ऊर्जा. या व्यापक पर्यावरणव्यवस्थेच्या अंतर्गत अनेक लहान-मोठ्या, स्वयंपूर्ण उपव्यवस्था आढळतात. समुद्र, अरण्य आणि तळे या अशा काही पर्यावरणव्यवस्था आहेत. सूर्याची ऊर्जा वापरून हजारो वर्ष अरण्य आपल्या संतुलित व्यवस्थेत जगत असते. अरण्यातील वनस्पती, वृक्ष, कीटक, प्राणी हे एकमेकांशी भक्षकाच्या नात्यांनी जोडेलेले असतात. ही नाती एका गुंतागुंतीच्या जाळ्याची गुंफन करतात. या जाळ्यातील कोणताही घटक या व्यवस्थेच्या निरूपयोगी नसतो, तर त्या व्यवस्थेचे गतीमान संतुलन कायम राखण्यामध्ये मोलाचे काम तो करीत असतो.[२]

सजीव जातीच्यापुनर्निर्माण-चक्रासाठी भौतिक परिसरातील जैविक-भौतिक-रासायनिक चक्रे आवश्यक असतात. पाणी, कार्बन, प्राणवायू व नायट्रोजन यांची निसर्गातील घटक पर्यावरणात मिसळतात, जीवनसृष्टीकडून शोषले, वापरले जातात व त्यांच्याकडून पुन्हा पर्यावरणात सोडले जातात. जलचक्राचे उदाहरण सर्वपरिचित आहे. पृथ्वीवर पोहचणाऱ्या सौरऊर्जेपैकी एकचतुर्थांश ऊर्जा महासागरांच्या पाण्याचे बाष्पीभवन करण्यात जाते. २१० घनमैल एवढे या बाष्पाचे प्रमाण आहे. यापैकी १८६ घनमैल बाष्प पुन्हा पावसावाटे महासागरात कोसळते. उरलेले चोवीस घनमैल बाष्प वाऱ्यांनी भूपृष्ठांच्या दिशेने पसरविले जाते. भूपृष्ठांवर दररोज पाऊस, दव आणि बर्फ यांच्या रुपात ६२.५ घनमैल पाण्यचा वर्षाव होतो. यापैकी ३८.५ घनमैल पाणी बाष्पीभवनावाटे पुन्हा वातावरणात निसटते. उरलेल्या पाण्यापैकी काही वनस्पती शोषून घेतात, काही जमिनीत मुरून नद्या—नाले, तळी यांच्यावाटे प्रवास करीत,



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66-
ISSN : 2348-7143
October. 2018

प्रवासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर पृथ्वीवरील जीवाणू, कीटक, वनस्पती व प्राणी यांच्या गरजा भागवते व चोवीस घनमैल एवढे पाणी समुद्रात मिळून जलचक्रपुरे होते. प्राणवायू, कार्बन नायट्रोजन इत्यादींचाही अशी चक्रे पृथ्वीवरील जीवसृष्टीला पोसत असतात.[३]

पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे घटक पुनर्निर्मीतक्षम असतात, व नैसर्गिक चक्रे परस्परासंबंधीची नाजूक जाळी आणि अन्नसाखळीची ऊतरंड यांना जोपर्यंत असह्य धक्का पोचत नाही तोपर्यंत त्यांच्या पुनर्निर्मीतीचा आणि पर्यायाने पर्यावरण व्यवस्थेचा समतोल राखला जातो. सृष्टीतील निर्जीव घटक दगड, खनिजे, धातू इत्यादी पुनर्निर्मीतीक्षम नसतात व त्यांचा साठा मर्यादित असतो.

पर्यावरण संरक्षण चळवळी संदर्भात देश, विदेशातील विव्दानांनी विविधांगी संषोधनपर अध्यन केले आहे. यापैकी उपलब्ध व विषयास अधिक समर्पक अशाच घटनांचा आढावा प्रस्तुत शोाध निबंधात घेतला आहे. याच अनुषंगाने उपर्युक्त शिर्षकावरून प्रस्तुत विवेचन पुढील उद्दिष्टांना अनुसरून केले आहे.

१. पर्यावरण संरक्षण चळवळीचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अध्ययन करणे.
२. 'पर्यावरणाची जनजागृती' सद्यस्थितीस किती उपयुक्त ठरते याचा अभ्यास करणे.
३. 'पर्यावरण संरक्षण' या संकल्पनेचा अभ्यास करणे.
४. 'पर्यावरण चळवळ' आणि 'भारतीय समाज' यामधील परस्पर संबंध जाणूण घेणे.
५. उत्तरआधुनिकतेत पर्यावरण संरक्षण चळवळीचे महत्व ओळखणे.
६. संकलीत माहितीचे विश्लेषण करणे.

प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. त्यामध्ये दुय्यम स्त्रोत, नियतकालिके, लेख, वर्तमानपत्रे, शासकीय लेख, वैचारीक लेख, संकेत स्थळे, इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दीष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये स्विकारलेली होती ती खालीलप्रमाणे आहेत.

१. पर्यावरणाची हानी दिवसेंदिवस वाढत आहे.
२. भारतीय समाजामध्ये पर्यावरणाची जाणीवजागृती केल्याशिवाय पर्यायच नाही; तर प्राथमिक शिक्षणात अंतर्भाव करणे अनिवार्य आहे.

या अनुषंगाने दुय्यम सामुग्री पध्दतीव्दारे पर्यावरण संरक्षण चळवळीचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. 'पर्यावरण', 'संरक्षण' आणि 'चळवळ' ह्या संकल्पना विविध शास्त्रांमध्ये अभ्यासल्या जात असल्यातरी, ती आंतरविद्याशाखीय तसेच विविधशाखीय संकल्पना आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण खालीलप्रमाणे आहे

**नैसर्गिक साधनांचा उपयोग व दुरूपयोग[४] :**

निसर्गावर संस्कार करण्याची, निसर्गातील वेगवेगळ्या व्यवस्थांमध्ये, चक्रामध्ये बदल घडवून आणण्याची आपली क्षमता मनुष्याने शेतीचा शोध लावला तेंव्हाच दाखवून दिली. परंतु त्यानंतर अनेक शतके त्याचा निसर्गातील हस्तक्षेप इतका मर्यादित राहीला की, त्याने घडवून आणलेले बदल कायमचे न ठरता; ते सामावून घेण्याची कुवत निसर्गव्यवस्थेत होती. दोन गोष्टीमुळे ही परिस्थिती बदलली असे म्हणता येईल. मानवी लोकसंख्येतील गुणाकाराच्या पटीत झालेली वाढ आणि विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती विज्ञानतंत्राच्या साहाय्याने शेतीच्या आणि अन्नोत्पादनाच्या नवनव्या, अधिकाधिक कार्यक्षम पध्दती माणसाने शोधुन काढल्या. नवनवीन वस्तूंचे उत्पादन त्याने सुरू केले. त्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारचा कच्चा माल मिळविण्यासाठी वाढत्या प्रमाणावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर सुरू झाला.



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66-
ISSN : 2348-7143
October. 2018

औद्योगिक क्रांतीनंतर या प्रक्रियेला एकदम वेग आला. सतत उंचावणारे राहणीमान हेच उदिष्ट मानले गेले मग त्यासाठी सर्व प्रकारच्या उत्पादनातील वाढीव लक्ष केंद्रित करण्यात येऊ लागले. अर्थातच वाढीव उत्पादन साधण्यासाठी निसर्गातील साधनसंपत्तीची अमर्याद लूट होऊ लागली. अशा दूष्टचक्रात मानवजात गूरफटली. निसर्गातील विविध घटकांचे ज्या प्रमाणात पुनर्निर्माण होत असते, त्यापेक्षा अनेक व्यवस्थेचे नाजूक तोल ढासळू लागले. याचा प्रत्यय सतत बिघडत जाणारे वातावरण व पाणी, खनिजांचा व धातूंचा वाढता तूटवडा, वेगाने भुईसपाट होत चाललेली आरण्ये आणि जमीनीचा कमी होत जाणारा कस आशा अनुभवामधून येऊ लागला.

पर्यावरणात घडून येत असलेले हे बदल धोक्याचे आहेत, संतुलित पर्यावरण व्यवस्थांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर चालू केलेला हस्तक्षेप वेळीच बंधन घातले नाही; तर पथ्वीवरील सजीव सृष्टीचे आणि त्याबरोबर मनुष्यजातीचेही अस्तित्व धोक्यात येईल. अशा जाणीवेतून पर्यावरणवादाचा जन्म झाला. पर्यावरणशास्त्राचा वेग हा असा अभ्यास सुरु होऊन केवळ तीस चाळीस वर्षे झाली आहेत.

इ.स. १९६० मध्ये 'क्लब ऑफ रोम' या नावाखाली एक्त्र आलेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील काही शास्त्रज्ञांनी विकासाच्या मर्यादा (The Limits to Growth) नावाचा एक अहवाल प्रसिध्द केला. विकासालाही मर्यादा आहे आणि म्हणून आपण सतत उंचावते जीवनमान, उद्योगधंदे कारखानदारी अशा गोष्टीपासून सावध राहिले पाहिजे या संदर्भात अधिक चुका टाळायच्या असतील तर, निसर्गाचा उपयोग करण्यासाठी जागतिक पातळीवरची श्रमविभागणी केली पाहिजे आणि स्पर्धेला आळा घातला पाहिजे असे या अहवालाचे थोडक्यात म्हणणे होते. जागतिक पातळीवर पर्यावरणाच्या प्रमुख समस्या म्हणून खालील तीन मुद्याचा विचार झाला पाहिजे.

१. नैसर्गिक साधनस्त्रोत संपुष्टात येण्याचा धोका वाटत आहे.
२. हवा, पाणी व जमीन यांचे औद्योगिक कचऱ्यामुळे होत असलेले प्रदुषण वाढत आहे.
३. पृथ्वीवरील अनेक जीवजातीचा कायमचा निर्वंश होत आहे.

**पर्यावरण संरक्षणाची चळवळ[५] :**

पर्यावरण चळवळीतील महत्वाचा टप्पा म्हणजे युरोपमधील 'ग्रीन्स' ही चळवळ. आर्थिक व्यक्तीवाद, भौतिकवाद, उद्योगवाद यांना विरोध, पर्यावरणाचे संरक्षण-संवर्धन, शांतता, विकेंद्रीकरण अशा तत्वावर आधारलेला दृष्टीकोन म्हणजे 'हरित' किंवा 'ग्रीन्स' या राजकीय पक्षाने (इ.स. १९८७ मध्ये) जर्मन पार्लमेंटमध्ये सहा टक्के जागा मिळविल्या आहेत. पर्यावरणवादी जाहीरनामा बाळगणारा आणखी एक राजकीय पक्ष म्हणजे इंग्लंडमधील 'इकॉलॉजी पार्टी'. आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण चळवळ करणाऱ्या दोन मोठ्या स्वंयसेवी संघटना उल्लेखणीय काम करीत आहेत. यापैकी 'ग्रीन पीस' ही संघटना मुख्यत्वे करून अणुस्फोट चाचण्या, देवमाशाची व्यापारी नफ्यासाठी चाललेली कत्तल. अशांच्या विरोधात जोरदार निदर्शने करीत असते. दुसरी संघटना म्हणजे 'फ्रेंडस ऑफ द अर्थ' या संघटनेच्या प्रयत्नांनी इ.स. १९७२ मध्ये स्वीडनमध्ये पहिली जागतिक पर्यावरण परिषद भरली. 'स्टॉकहोम कॉन्फरन्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या ऐतिहासिक परिषदेत अनेक राष्ट्रांनी भाग घेतला व जगापुढील पर्यावरण समस्यांवर प्रथमच धोरणांच्या पातळीवर चर्चा केली.

पर्यावरणविषयक जाणीव जसजशी प्रगल्भ होत आहे, तसतसा औद्योगिक धोरणांना, विकासाच्या प्रचलित धोरणाला लोकमताच्या वाढत्या दबावाला तोंड द्यावे लागत आहे. उच्च तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरातून प्रदूषणाच्या गंभीर समस्या जसजशा जोर वाढतांना दिसत आहेत तसतसा पर्यावरण चळवळीचा जोर वाढत आहे. जपानमधील 'मिनमाटा', अमेरीकेतल 'थ्री माईल आयलंड', भारतातील भोपाळ आणि रशियातील चर्नोबिल या दुर्घटना प्रदूशणाचे तीव्र आणि अतिघातक स्वरूप स्पष्ट करतात. यातील प्रत्येक घटनेनंतर पर्यावरणाची वाढतीदखल घेणे नवीन औद्योगिक आणि रासायनिक प्रकल्पांना भाग पडत असल्याचे दिसते.



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)–6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) –0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66- October. 2018

**भारतातील पर्यावरण समस्या :**

जगतिक पातळीवरील पर्यावरणसमस्या, नैसर्गिक साधनसंपत्तीचा भरून न येणारा नाश, वातावरणाचे व पाण्याचे प्रदूषण आणि बिघडते आरोग्यमान भारतातही दिसतातच आणि त्याचे स्वरूप येथील मोठ्या लोकसंख्येमुळे, गरिबीमुळे अधिकच गंभीर बनते. हरितक्रांतीद्वारे धान्याचे प्रचंड उत्पादन निघाले हे निर्विवाद, परंतु त्यासाठी केल्या गेलेल्या रासायनिक खतांच्या कृत्रिम व अतिरिक्त सिंचनाच्या वापरामुळे जमीन कसहीन अथवा चीबड (खारवट) झाल्याचा अनुभव आज निर्माण झाला आहे. अनियोजित औद्योगिक विस्तार आणि शहरीकरणाची वाढ यामुळे वातावरण बदलत आहे. तसेच बहुतेक नद्या अत्यंत प्रदुषित झालेल्या आहेत. गंगेच्या शुध्दीकरणासाठी म्हणूनच कोट्यावधी रूपयांच्या योजना हाती घेणे भाग पडत आहे.

**जंगलतोडीचा परिणाम :**

भारतातील ऊर्जेच्या एकूण वापरापैकी पन्नास टक्के ऊर्जा घरात स्वंयपाकासाठी वापरली जाते. त्यापैकी सत्तर टक्याहून अधिक आजही लाकूडफाटा व शेण यापासून मिळविली जाते. घरगुती वापरांच्या इंधनासाठी कोणतेही नियोजन न केल्याचे परिणाम प्रचंड प्रमाणावरील जंगलतोडीतून दिसतात. व्यापारी नफ्यासाठी बेसुमार वृक्षतोड केली जात आहे. ती वेगळीच इ.स. १९७३ मध्ये भारतातील जमिनीपैकी सतरा टक्के जंगलासाठी होती. आज हे प्रमाण केवळ अकरा टक्के आहे. जंगलतोडीचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे झाडांच्या मुळांच्या आधाराअभावी पावसाच्या पाण्याने जमिनीची धूप होते व माती वाहून धरणामध्ये व कालव्यामध्ये साठते. परिणामी धरणाचे आयुष्य कमी होते. पुरांचे प्रमाण जंगतोडीशी निगडीत असल्याचाही पुरावा उघड झाला आहे. पाण्यांच्या नियोजनाबाबत आजही पर्यावरणीय दृष्टीकोणाचा अभावा असल्याने एकीकडे देशाच्या काही भागात शेतजमिनी अतिसिंचनाने खारवट किंवा चिबड होत आहेत, तर इतर काही भाग दुष्काळाच्या छायेत आहेत.

**निष्कर्ष:**

रासायनिक खतावर आधारलेली शेती, सिंचनाच्या व्यवस्था, मोठी धरणे, रासायनिक उद्योगांच्या जागा, अनिर्बंध शहरीकरण, जलाशयाचे व वातावरणाचे प्रदूषण, जंगलाचा नाश या प्रमुख पर्यावरण समस्यांवर देशात विचारमंथन सुरू झालेले दिसते.

पर्यावरण प्रबोधन करणाऱ्या तसेच पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्रकल्पाच्या विरोधात संघर्षात्मक कार्य करणाऱ्या संघटना व संस्था गेल्या दहापंधरा वर्षात उभ्या राहिल्या आहेत. पर्यावरणदृष्ट्या उल्लेखनीय घटनांमध्ये 'चिफ्को आंदोलन', 'सायलेंट व्हॅली माहिम', भोपाळ दुर्घनेवरील काम, टेहरी आणि नर्मदा खोरे योजनांवरील वाद यांचा समावेश करता येईल.

शासकीय पातळीवर इ.स. १९८६ मध्ये पर्यावरण खात्याचे रूपांतर केंद्रीय मंत्रालयात करण्यात आले. औद्योगिक क्रांतीनंतर या प्रक्रियेला एकदम जोर आला. सतत उंचावणारे राहणीमान हेच उद्दिष्ट मानले गेले. मग त्यासाठी सर्व प्रकारच्या उत्पादनातील वाढीवर लक्ष केंद्रीत करण्यात येऊ लागले. अर्थातच वाढीव उत्पादन साधण्यासाठी निसर्गातील साधनसंपत्तीची अमर्याद लूट होऊ लागली. अशा दुष्टचक्रात मानव समाज गुरफटला. निसर्गातील विविध घटकांचे त्या प्रमाणात पुनर्निर्माण होत असते, त्यापेक्षा अनेक पट अधिक वेगाने त्याचा ऱ्हास सुरू झाल्याने निसर्गातील अनेक व्यवस्थाचे नाजूक तोल ढासळू लागले. याचा प्रत्यय सतत बिघडत जाणारे वातावरण व पाणी खनिजाचा व धातुंचा वाढता तुटवडा, वेगाने भुईसपाट होत चाललेली अरण्ये आणि जमीनीचा कमी होत जाणारा कस (पोत किंवा सुपिकता) अशा अनुभवामधून येऊ लागला.



ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66-
ISSN : 2348-7143
October. 2018

पर्यावरणात घडून येत असलेले हे बदल धोक्याचे आहेत, संतुलित पर्यावरण व्यवस्थेमध्ये मानवाने फार मोठ्या प्रमाणावर चालू केलेला हस्तक्षेप वेळीच आवरली नाही, तर पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे आणि त्याबरोबर मनुष्य जातीचेही अस्तित्व धोक्यात येईल, अशा जाणीवेतून पर्यावरणवादाचा जन्म झाला. पर्यावरणाशास्त्राचा वेगळा असा अभ्यास सुरू होऊन केवळ तीस-चाळीस वर्षे झाली आहेत. पण भारतामध्ये पाहिजे तसा प्रतीसाद शासनाकडून व मानवाकडून मिळत नाही. पर्यावरण कायद्याची अमंलबजावणी अतीशय कडक असायला पाहिजे, जेणे करुन मानवाला शीस्त लागेल.

**संदर्भ सूची:**

१. गर्गे स. मा. (२००७),'*भारतीय समाजविज्ञान कोष*', पुणे: मेहता पब्लिशिंग हाउस, व्दितीयावृत्ती, पृ. २१२
२. कित्ता, पृ. २१२
३. कित्ता, पृ. २१३
४. कित्ता, पृ. २१३
५. कित्ता, पृ. २१४



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.